सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०१/२०२६, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ**:- महाराष्ट्र शासन,गृह विभाग,शासन निर्णय क्रमांक सीसीटी-३६२५/प्र.क्र १४४१२४६२५८ ई/पोल-३,दि.१०/०७/२०२६

**विषय**:- वन स्टेट वन ई-चलान प्रकल्पासाठीच्या प्रकल्प संचालकास मुदतवाढ देणेबाबत

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक सीसीटी-३६२५/प्र.क्र १४४१२४६२५८ ई/पोल-३,४,दि.१०/०७/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०७१०१७३९२९२६२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
Chandrashekhar Govindrao Shinde
Date: 16-07-2026 14:36:15

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का) (अति.कार्यभार )
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई. (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह).
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक,(आस्थापना/कायदा व सुव्यवस्था /आर्थिक गुन्हे/दहशतवाद विरोधी पथक/ विशेष कृती/ प्रशासन/ वाहतूक/ प्रशिक्षण व खास पथक फोर्स वन नागरी हक्क संरक्षण/ सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग), महाराष्ट्र राज्य
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह)
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण,माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
पोलीस महानिरीक्षक, (नियोजन व समन्वय) , महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था/ प्रशासन/ प्रशिक्षण व खास पथके),

महाराष्ट्र राज्य, मुंबई.

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.

विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.

संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.

सर्व पोलीस अधीक्षक ( गुन्हे/ बिनतारी संदेश/लोहमार्ग).

पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.

प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.

सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र.

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते २०

सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता/ धोरण/ नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.

सर्व कार्यासन अधिकारी, का क्र.१ ते ४४

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

वन स्टेट वन ई-चलान प्रकल्पासाठीच्या प्रकल्प
संचालकास मुदतवाढ देणेबाबत

# महाराष्ट्र शासन
## गृह विभाग

**शासन निर्णय क्रमांक : सीसीटी३६२५/प्र.क्र.१४४१२४६२५८-ई//पोल-३,**
**गृह विभाग, दुसरा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक : १० जुलै,२०२६.**

**वाचा :**

१. शासन निर्णय, वित्त विभाग क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२,दि.१७.०४.२०१५.
२. शासन निर्णय, गृह विभाग क्रमांक: सीसीटी-३६१७/प्र.क्र.२/पोल-३,दि.०५.०६.२०१७.
३. शासन निर्णय, गृह विभाग क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र.६४/विशा-३(अ),दि.०४.०८.२०१७.
४. अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दिनांक १५.११.२०१७ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.
५. शासन निर्णय, गृह विभाग क्र. सीसीटी-३६१७/प्र.क्र.०२/पोल-३,दि.०३.०२.२०१८.
६. शासन निर्णय, गृह विभाग क्र. सीसीटी-३६१७/प्र.क्र.०२/पोल-३,दि.१२.११.२०१८.
७. महाराष्ट्र शासनाच्या वतीने अपर पोलीस महासंचालक (वाहतुक) आणि मे.टेलिकम्युनिकेशन्स कन्सल्टंट्स इंडिया लिमिटेड यांचे दरम्यान दि.११.१२.२०१८ रोजी झालेला करार.
८. अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) क्र.३२८४/२०१८, दि.११.१२.२०१८ चे कार्यादेश.
९. अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) क्र.१०५२/२०१९, दि.२२.०४.२०१९ चे पत्र.
१०. गृह विभाग, शासन पत्र क्र.सीसीटी-३६१७/प्र.क्र.२/पोल-३,दि.२९.१.२०२४
११. उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि.१३.०५.२०१९, दि.१४.०८.२०१९, दि.१३.०७.२०२२ व दि.६.३.२०२४ आणि दि. ५.६.२०२६ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.
१२. गृह विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण ३६२५/७६/ई-११०६१९६/पोल-३, दि.२८.४.२०२६.
१३. अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) यांचे जा.क्र.अपोमसं (वा) / ४५ / नियोजन / ई चलान / शासन निर्णय निर्गमित होणेबाबत /२०२६ दि.१९.६.२०२६ रोजीचे पत्र.

**प्रस्तावना -**

राज्यातील वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत असुन त्यामुळे वाहतुक कोंडी व इतर समस्या निर्माण होत आहेत. वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांकडुन दंड वसुलीदरम्यान वाहतुक पोलीस कर्मचारी/अधिकारी यांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे वाहतुक समस्यांवर अंकुश ठेवणे व कसुरदार व्यक्तींवर प्रभावी तथा पारदर्शकपणे कारवाई करण्यासाठी राज्यामध्ये ई-चलान प्रकल्प राबविण्यास व त्यासाठी येणाऱ्या रु.५९,१२,३१,५०७/- एवढ्या निधीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता शासन निर्णय, गृह विभाग दि.०३.०२.२०१८ नुसार देण्यात आली आहे. ई-चलान प्रकल्पाच्या निविदा प्रक्रीयेतुन पात्र ठरलेल्या पुरवठादाराच्या निवडीस उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीने दि.०७.०९.२०१८ च्या बैठकीत मान्यता दिलेली आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या वतीने अपर पोलीस महासंचालक (वाहतुक) आणि मे. टेलिकम्युनिकेशन्स कन्सल्टंट्स इंडिया लिमिटेड यांचे दरम्यान दि.११.१२.२०१८ रोजी पाच वर्षांचा करार करण्यात आलेला आहे. सदर करार हा कार्यारंभ आदेशापासून पाच वर्षांसाठी आहे. तसेच यशस्वी अंमलबजावणी व चांगल्या सेवा विचारात घेऊन वाहतूक पोलीस हा करार पुढील २ वर्षे वाढवू शकतात अशी तरतूद करारात आहे. संदर्भ क्र.८ येथील पत्राद्वारे मे. टेलिकम्युनिकेशन्स कन्सल्टंट्स इंडिया लिमिटेड यांना कार्यादेश देण्यात आले आहेत.

उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि.१३.०७.२०२२ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार संदर्भ क्र.११ येथील शासन निर्णयान्वये राज्यात ई-चलान प्रकल्पाच्या कार्यान्वयन तसेच देखभाल व दुरुस्तीसाठी (Operation & maintenance) येणाऱ्या रु.९० कोटी इतक्या अतिरिक्त निधीच्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे ई-चलान प्रकल्पाच्या एकूण रु.१४९ कोटी इतक्या खर्चास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तद्नंतर राज्यात "वन स्टेट वन ई-चलान प्रकल्पाच्या" कार्यान्वयन तसेच देखभाल व दुरुस्ती (Operation & Maintenance) साठी येणाऱ्या रु.५० कोटी इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार ई-चलान प्रकल्पास एकूण रु.१९९ कोटी इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

३. वन स्टेट वन ई चलान प्रकल्पासाठी पुरवठादार मे.टेलिकम्युनिकेशन्स कन्सल्टंट्स इंडिया लिमिटेड यांची मुदत दि.६.३.२०२६ रोजी संपुष्टात येत असल्याची वस्तुस्थिती विचारात घेऊन अ.मु.स. (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली दि.५.६.२०२६ रोजीच्या उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या बैठकीत "वन स्टेट वन ई-चलान"प्रकल्प पुरवठादार मे.टेलिकम्युनिकेशन्स कन्सल्टंट्स इंडिया लिमिटेड यांना मुदतवाढ देणे" या विषयावर चर्चा झाली. सदर बैठकीत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

(१) मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.११.५.२०२६ रोजी ई-चलान प्रकल्पासंदर्भात बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत मा. मुख्यसचिव महोदयांनी पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत:

- वन स्टेट वन ई-चलान प्रकल्पाचा कालावधी दि.६.३.२०२६ रोजी संपुष्टात आला आहे. त्यास दि.१५.६.२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी.
- "वन नेशन वन ई-चलान" प्रकल्पाची अंमलबजावणीकरिता पोलीस महासंचालक यांनी दि.२५.५.२०२६ पर्यंत सविस्तर प्रस्ताव सादर करावा.
- वन नेशन वन ई-चलान प्रकल्पाची अंमलबजावणीकरिता कालबध्द टप्पेनिहाय नियोजन करण्यात यावे.

(२) अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) यांच्याकडून वन नेशन वन ई-चलान प्रकल्पाचा प्रस्ताव सादर करण्यास विलंब झाला असून पुढील एका आठवड्यांच्या कालावधीत प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या बैठकीत देण्यात आल्या.

(३) वन स्टेट वन ई-चलान प्रकल्पाचा कालावधी दि.६.३.२०२६ रोजी संपुष्टात आला आहे. तथापि, राज्यात "वन नेशन वन ई-चलान प्रकल्पाची" अंमलबजावणी सुरु करण्याकरिता काही कालावधी लागणार आहे.

(४) तसेच, केंद्र शासनाच्या सडक परिवहन व राजमार्ग मंत्रालयाच्या दि.२०.१.२०२६ रोजीच्या अधिसूचनेनुसार ई-चलान सहा महिन्यांच्या कालावधीनंतरही बाद / रद्द होणार नाहीत.

(५) वाहतूक नियमांची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्याकरिता "वन स्टेट वन ई-चलान प्रकल्प" काही कालावधीकरिता सुरु ठेवणे आवश्यक असल्याने दि.३१.७.२०२६ पर्यंत सदर प्रकल्पास मुदतवाढ देण्याचा निर्णय उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या बैठकीत घेण्यात आला.

वरीलप्रमाणे "वन स्टेट वन ई चलान प्रकल्पासाठी" पुरवठादार मे.टेलिकम्युनिकेशन्स कन्सल्टंटस् इंडिया लिमिटेड यांना मुदतवाढ देणेबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

<u>शासन निर्णय</u> -

वन स्टेट वन ई चलान प्रकल्पासाठी पुरवठादार मे.टेलिकम्युनिकेशन्स कन्सल्टंटस् इंडिया लिमिटेड यांना वाहतूक नियमांची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्याकरिता "वन स्टेट वन ई-चलान

प्रकल्प” काही कालावधीकरिता सुरु ठेवणे आवश्यक असल्याने दि.३१.७.२०२६ पर्यंत सदर प्रकल्पास मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. प्रस्तुत प्रकरणी उपरोक्त प्रमाणे होणारा खर्च “मागणी क्र.बी-१, २०५५- पोलीस (०१) (०६) ई-चलान प्रकल्प (कार्यक्रम) (२०५५ ए२८४), १३- कार्यालयीन खर्च, व ५२ यंत्रसामुग्री व साधनसामुग्री,” या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो त्या-त्या वित्तीय वर्षासाठी उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०७१०१७३९२९२६२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NAGNATH RAMCHANDRA JADHAV

Digitally signed by NAGNATH RAMCHANDRA JADHAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Home Department, 2.5.4.20=13C3ACFAE7FC8126CE285621D58425C075E0F60C5F67596D7F7181EA8CC9011E, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=43D41039958F4FA2CBAEB247FAE932CC6267D47DE282ACE9AEFCEA0F0CAC955E, cn=NAGNATH RAMCHANDRA JADHAV
Date: 2026.07.10 17:40:42 +05'30'

**(नागनाथ जाधव)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत:**

१. मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक.
३. प्रधान सचिव (विशेष) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक.
४. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
७. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
८. महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१०. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
११. मे. टेलिकम्युनिकेशन्स कन्सल्टंट्स इंडिया लिमिटेड, टीसीआयएल भवन, ग्रेटर कैलास-१, नवी दिल्ली-४८.
१२. मे. केपीएमजी ॲडवायझरी सर्व्हिसेस प्रा.लि., मुंबई.
१३. वित्त विभाग, व्यय-७/वित्तीय सुधारणा.
१४. अर्थसं-१/गृह विभाग, मुंबई.
१५. रोख शाखा/गृह विभाग, मुंबई.
१६. निवडनस्ती, पोल-३.

*******